जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांच्या आस्थापनेवरील अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक: अस्थायी ०३१८/३६५/प्र.क्र.७५/कार्यासन ११
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १६ मार्च, २०१८.

पहा : १. शासन निर्णय वित्त विभाग क्र.असंक १००१/प्र.क्र.२९/२००१, वित्तीय सुधारणा, दि.१०/९/२००१
२. शासन निर्णय क्र. अस्थायी ०११८/प्र.क्र.३२/कार्यासन११, दि.२०/०१/२०१८.
३. शासन निर्णय वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.०५/०३/२०१८.
४. जिल्हा व त्र न्यायालय,रायगड-अलिबाग यांचे पत्र क्र. प्रशा/७२६ सन२०१८, दि.०१/२/२०१८.

शासन निर्णय :

जिल्हा न्यायालय,रायगड-अलिबाग या आस्थापनेवरील ८४ अस्थायी पदांना संदर्भाकित क्र.२ च्या शासन निर्णयान्वये दि. १/१/२०१८ ते २८/०२/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग या आस्थापनेवरील पुढील तक्त्यात नमूद ८४ अस्थायी पदांना या शासन निर्णयान्वये त्यापुढील म्हणजेच दि.०१/०३/२०१८ ते ३०/०९/२०१८ पर्यंतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	अस्थायी पदांची संख्या
१	अधीक्षक	०१
२	सहायक अधीक्षक	०६
३	लघुलेखक (उ.श्रेणी)	०१
४	लघुलेखक (नि.श्रेणी)इंग्रजी	०२
५	लघुलेखक (नि.श्रेणी)मराठी	०१
६	वरिष्ठ लिपीक	१०
७	कनिष्ठ लिपीक	३५
८	वाहन चालक	०१
९	मुख्य बेलिफ	०३
१०	बेलिफ	०९
११	शिपाई	०९
१२	पहारेकरी	०३
१३	पुर्णवेळ सफाईदार	०२
१४	अंशकालीन सफाईदार	०१
	एकूण पदे	८४

३. यासाठी होणारा खर्च जिल्हा न्यायालय, रायगड या कार्यालयासाठी मागणी क्र.जे-१, २०१४, न्यायदान, (०२) जिल्हा व सत्र न्यायाधीश, (०२)(०१) जिल्हा व सत्र न्यायाधीश (अनिवार्य) (२०१४ ०१७२) ०१, वेतन या लेखाशीर्षाखाली सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षात मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६ आ.पु.क.,दि.५/३/२०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३१७१६०४०१३४१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Anita Dipak Ripote

Digitally signed by Anita Dipak Ripote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=28bdb8b03e204307a26238ccccb76a2c1eaa9ed4838f450b88dfb9ca9793b4b5, serialNumber=25e18795e96deb90b1428c41cb6c87bc90c3bb1f0ea059da3e0a07a3bc00c6c8, cn=Anita Dipak Ripote
Date: 2018.03.17 16:06:25 +05'30'

(अनिता रिपोटे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,:

१) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई
२) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई,
४) महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड.
६) वित्त विभाग, व्यय ५/आ.पु.क.कक्ष/अर्थसंकल्प ११, मंत्रालय, मुंबई.
७) विधि व न्याय विभाग, कार्या.२०/कार्या.२३, मंत्रालय, मुंबई.
८) निवडनस्ती (कार्यासन ११).

****